# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## वृत्तपत्र विद्या अभ्यासक्रम

## असाईनमेंट्स (२०१५-१६)

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

नूतन वर्षाच्या आपणास हार्दिक शुभेच्छा!

वृत्तपत्र विद्या पारंगत (एम.जे.) या अभ्यासक्रमासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक परीक्षेचा एक भाग म्हणून शोध प्रकल्प हा शंभर गुणांसाठी विषय आहे.

### शोधनिबंधासाठी या वर्षीचे विषय

१) देशात असहिष्णुता वाढली आहे का?

२) महागाईचा ब्रह्मराक्षस

३) प्रदूषणाची समस्या तीव्र होत आहे का?

असे असून यापैकी **एक विषय** निवडून त्यावर सुमारे २५ ते ३० पानांचा **शोधनिबंध** सादर करावयाचा आहे.

शोधनिबंधात काही आकडेवारी, तक्ते, आलेख, मुलाखती, प्रश्नावली, छायाचित्रे यांचाही समावेश करावा. विद्यार्थ्यांनी शोधनिबंध हस्ताक्षरात किंवा डी.टी.पी. करून दि. १५ मार्च २०१६ पूर्वी विद्यापीठाकडे सादर करावा.

### शोधनिबंधांची पार्श्वभूमी

दादरीमधल्या इकलाखच्या हत्येपासून देशात असहिष्णुतेची चर्चा सुरू झाली. परंतु केवळ हत्या म्हणजे असहिष्णुता नव्हे. असहिष्णुतेच्या वातावरणाची चर्चा बिहार विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होती. परंतु आमीर खान, शाहरूख खान या अभिनेत्यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेमुळे तसेच मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एकेरी उल्लेख केल्यानंतर ज्या उलटसुलट प्रतिक्रिया आल्या; त्यातूनही असहिष्णुतेच्या वातावरणाचा प्रत्यय येऊ लागला. विरोधी मत मांडणाऱ्यावर सोशल मीडियाच्या माध्यमातून होणारे शाब्दीक हल्ले आणि संबंधितांचे चरित्रहनन हेसुद्धा असहिष्णुतेतच येते. कोणी म्हणतो भाजप राजवटीत असहिष्णुता वाढली, कोणाला हा देश सोडून जावेसे वाटते. खरोखरीच देशात असहिष्णुता वाढली आहे का? देशाची परिस्थिती बिघडली आहे का? त्याची कारणे कोणती? 'अतिथी देवो भवो' अशी जाहिरात करणाऱ्या आमीर खानला असहिष्णुता जाणवते. या उलट अनुपम खेर यांना आमीरच्या वक्तव्यात राजकीय टीका जाणवते यामागे नेमके काय?

सहिष्णुता-असहिष्णुतेचा हा वाद अलिकडे वाढताना दिसतो. सर्वधर्मसमभावाची शिकवण या देशाने जगाला दिली. विविध जाती, धर्म, पंथ, भाषा अशा विविधतेने भरलेल्या देशात सर्व प्रकारचे आदान प्रदान होत असताना असहिष्णुता आहेच कुठे असाही प्रश्न पडतो.

या पार्श्वभूमीवर तुम्हाला **देशात असहिष्णुता वाढली आहे का?** या विषयावरील शोधनिबंध सादर करायचा आहे. या विषयासाठी गेल्या तीन-चार महिन्यातील वृत्तपत्रे, नियतकालिके यात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख,

अग्रलेख यांचा संदर्भ म्हणून वापर करता येईल. आपल्या भागातील प्राध्यापक, वकील, राजकीय नेते, सामान्य नागरिक यांच्या मुलाखती घेता येतील. त्यावरून आपण हा शोधनिबंध लिहावयाचा आहे.

शोधनिबंधासाठी पर्यायी दुसरा विषय **महागाईचा ब्रह्मराक्षस** हा आहे. गेल्या काही दिवसांत देशातली जनता महागाईने त्रस्त झाली आहे. तूरडाळीच्या भाववाढीवरून मोठे वादळ निर्माण झाले होते. या महागाईची कारणे, त्यावरील उपाय शोधनिबंधातून अपेक्षित आहेत.

तिसरा विषय **प्रदूषणाची समस्या तीव्र होत आहे का?** हा आहे. दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरात वायूप्रदूषण रोखण्यासाठी सम–विषम वाहन प्रयोग राबविण्यात आला. पुण्या–मुंबईतही प्रदूषण समस्या तीव्र होत आहे. वाहनांची वाढती संख्या, कारखान्यातून होणारे विषारी वायूचे उत्सर्जन, पाण्यातून होणारे प्रदूषण या घटकांच्या अभ्यासातून हा विषय शोधनिबंधाद्वारे विद्यार्थ्यांनी मांडणे अपेक्षित आहे.

वृत्तपत्र विद्या पदवी (B. J.) आणि वृत्तपत्र विद्या पारंगतच्या (M. J.) (रीपिटर्स) विद्यार्थ्यांसाठी शोध निबंधाकरिता हेच विषय असतील. या विद्यार्थ्यांनी यापैकी एक विषय निवडून शोधनिबंध लिहायचा आहे. बी. जे.च्या रीपीटर्स विद्यार्थ्यांनी शोधनिबंधाखेरीज प्रश्नपेढी आणि असाईनमेंटस् या दोन फाईल्स सादर करावयाच्या आहेत.

वृत्तपत्र विद्या प्रमाणपत्र (C. J.) परीक्षेसाठी प्रश्न विद्यार्थ्यांना दिलेल्या पेढीतील तिन्ही विषयांचे एकंदर तीस प्रश्न निवडून त्याची उत्तरे लिहावयाची आहेत. यासाठी पन्नास गुण असतील. या विद्यार्थ्यांनी कात्रण संग्रह सादर करावयाचा असून त्यासाठी मराठी साहित्य संमेलन हा विषय आहे. कात्रण संग्रहासाठी ५० गुण असतील.

या सर्व फाईल्स १५ मार्चपर्यंत आपआपल्या केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे.

**रामदास नेहूलकर**
समन्वयक